N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** आमगांव **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0356 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/09/2021 01:43 वाजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 29/09/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/09/2021
**Time From (वेळेपासून):** 15:52 वाजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:12 वाजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/09/2021 **Time (वेळ):** 01:43 वाजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/09/2021 01:43 वाजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोस्टे आमघाव रोड आमगाव,आमगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. चिरंजीव उर्फ मुन्ना नेवालाल बिसेन

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | हिराटोला,गोरेगाव,आमगांव,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | हिराटोला,गोरेगाव,आमगांव,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. दिलीप शंकरराव उरकुडे | | | 1. प्लाट नं54,राधेश्वर नगर,दिघोरी, नागपुर,नागपुर,नागपुर शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पंचनामा कार्यवाही पुर्ण केल्यानंतर

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | 05 मेमरी कार्ड 16 जीबी. क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे | 0.00 |
| 2 | कागदपत्रे आणि मुल्यवान रेखे | इतर कोणतेही कागदपत्रे | आरोपी यांचेकडे चौकशीतर असलेले कागदपत्र | 0.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या एकुण 06 भारतीय चलनाच्या नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 3,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की, वर नमुद घटा ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून तक्रारदाराने पो.स्टे आमगाव येथे नोंदविलेल्या अदखलपात्र तक्रारीवरून गै.अ. यांचेवर कार्यवाही करण्यासाठी तसेच तक्रारदाराविरुध्द पो.स्टे, आमगाव येथे नोंद असलेल्या अदखलपात्र तक्रारीवरुन तक्रारदारावर कार्यवाही न करण्याकरीता तक्रारदाराकडे रू. 5,000/- लाच रकमेची मागणी करून तडजोडीअंती तक्रारदाराकडुन लाच रक्कम रु. 3,000/- पंचासमक्ष स्विकारल्याचे फिर्यादीचे लेखी तक्रारीवरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.फिर्याद
ला.प्र.वि. गोंदिया
कम्प पो.स्टे. आमगाव
दि.29.09.2021नांव:-श्री. चिरंजीव उर्फ मुन्ना नेवालाल बिसेन, वय 36 वर्ष, व्यवसाय-षेती, मु. हिराटोला, पो. कालीमाटी, ता. गोरेगाव, जि. गोंदिया. मी दि. 23.09.2021 रोजी पोलीस निरीक्षक, श्री. अतुल तवाडे, ला.प्र.वि गोंदिया यांचे समक्ष एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने हस्तलिखीत तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.प्रति, मा. पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदियाविषय:- गैरअर्जदार यांचेविरूध्द लाच मागणी विषयी कार्यवाही होण्याबाबत.अर्जदार:- श्री. चिरंजीव उर्फ मुन्ना नेवालाल बिसेन, रा. हिराटोला, पो. कालीमाटी, ता. गोरेगाव, जि. गोंदिया महोदय, मि विनंतीपुर्वक अर्ज सादर की, मी हिराटोला येथील रहीवासी असुन शेतीचे काम करतो व आपला परिवारासोबत राहतो. आमच्या घराशेजारी राजु जगन्नाथ कुर्वे यांचे घर असुन त्यांचे घराचे बांधकान सुरू आहे. बांधकामासाठी लागणारे रेती ही त्यांनी माझ्या घरासमोरील अंगणात टाकली होती. दि. 22.09.2021 रोजीचे 09.30 वाजता दरम्यान मी राजु कुर्वे याला माझ्या घरासमोरील रेती उचलण्याकरीता बोललो असता त्यानी माझे काही न अयकता षिवीगाळ करून ढकल दुकल केला व मला आणि माझ्या पत्नीला मारपीट केली. सदर प्रकरणाची तक्रार देण्याकरीता मी पोलीस स्टेषन आमगाव येथे गेलो. तेथे पोलीसांनी माझ्या तक्रारीवरून नं. 1) राजु जगन्नाथ कुर्वे, 2) श्री. मनोहर जगन्नाथ कुर्वे यांचेविरूध्द पो.स्टे. आमगाव येथे एन.सी.आर. क्र. 0600/21 कलम 323,504, 506 भा.द.वी. अनुव्ये अ दखलपात्र गुन्हा नोंद करून त्याबाबची प्रत मला दिली. त्यानंतर आमच्या गावचे बिट अंमलदार सहा. पोलीस उपनिरीक्षक श्री. उरकुडे यांनी मला

आपला जवळ बोलावुन मटले की, तुम्ही दिलेल्या तक्रारीवरून मी राजु कुर्वे व मनोहर कुर्वे यांच्याविरूध्द कार्यवाही करतो, आणी तुझ्यावर
कार्यवाही करत नाही. परंतु त्याकरीता तुम्ही मला रू. 5,000/- दया, जर तुम्ही मला रुपये 5,000/- दिले नाही तर मी तुमच्याच विरूध्द
कार्यवाही करीन, असे बोलुन माझ्याकडे रुपये 5,000/- लाचेची मागणी केली. असे बोलुन गैर.अ सहा. पोउपनि श्री उरकुडे, पो.स्टे, आमगाव
यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाच रक्कम 5,000/- त्यांना देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचेविरुध्द कायदेषीर कार्यवाही करण्याकरीता
तक्रार देत आहे. त्यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही देवाण-घेवाण अथवा वैयमनस्ये नाही.तद्नंतर पो.नि. श्री. तवाडे यांनी दोन शासकीय पंचांना
पाचारण करुन त्यांची आमच्याषी ओळख करुन दिली व त्यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार त्यांना वाचावयास दिली.
पो.नि. श्री. अतुल तवाडे यांचे सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पो.नि. श्री. तवाडे यांनी स्वाक्षरी केली.
पो.नि. श्री. तवाडे यांनी प्रथम व्हाईस रेकॉंर्डर कषा प्रकारे काम करतो याबाबत आम्हास व पंचास सविस्तर माहीती दिली. त्यानंतर पो.नि. श्री.
तवाडे यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. 5,000/- त्यांच्याकडे जमा केली. पो.नि. तवाडे यांच्या
सांगण्यावरून पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर त्यांनी लाच रकमेला लावण्यात येणाऱ्या अथ्रासीन पावडरची वैषिष्ट सांगुन त्या
नोटांना अथ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक आपल्या अधिनस्थ कर्मचारी यांच्या हस्ते करुन दाखविले. त्यानंतर रू. 500/- दराच्या 10
चलनी नोटांना अथ्रासीन पावडर लावुन त्या नोटा पंचासमक्ष एका लिफाफ्यात ठेवुन तो लिफाफा ट्रपसुटकेसमध्ये पंचासमक्ष ठेवला. त्यानंतर पो.
नि. श्री. तवाडे यांनी गै.अ. विरुध्द पडताळणी कार्यवाही मोक्षधाम आमगाव येथुन करण्याचे ठरवुन मला व पंच क्र. 1 यांना माझ्या खाजगी मोटार
सायकलने मोक्षधाम आमगाव येथे जाण्यास रवाना केले. मी व पंच क्र. 1 मोक्षधाम आमगाव येथे पोहचलो. पो.नि. श्री. तवाडे हे सापळा
पथकासह आमच्या मागोमाग त्याठिकाणी पोहचले. पो.नि. श्री. तवाडे यांनी आम्हास व पंचास पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या
दक्षतेबाबत सुचना दिल्या. वेळ 17.29 वाजता व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. 1 व माझ्या आवाजात पडताळणीकरीता जात
असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकार्डरसह मला पंच क्र. 1 यांचेसोबत माझ्या खाजगी मोटार सायकलने गै.अ. श्री. उरकुडे
यांचेषी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता पो.स्टे. आमगाव येथे जाण्यास रवाना केले. मी पंच क्र. 1 सह पो.स्टे. आमगाव येथे गेलो
असता गै.अ. श्री. उरकुडे हे पो.स्टे. आमगाव येथे हजर नव्हते. त्यावरून मी आपले मोबाईलवरून गै.अ. श्री. उरकुडे यांचे मोबाईलवर संपर्क
साधुन मी पो.स्टे. आल्याचे त्यांना कळविले असता त्यांनी मला म्हटले की, माझी नाईट डयुटी होती, म्हणुन मी घरी आहे, तुम्ही उदया सकाळी
9.00 वा. पर्यंत पोलीस स्टेषनला या असे सांगितले. त्यानंतर वेळ 17.55 वा. मी पंच क्र. 1 यांच्यासह पो.नि. श्री तवाडे थांबुन असलेल्या
ठिकाणी परत आल्यावर व्हाईस रेकार्डर पंच क्र. 1 यांच्या आवाजात बंद करण्यात आले.त्यानंतर पो.नि. श्री तवाडे यांनी पंचासमक्ष व्हाईस
रेकार्डर मधील रेकार्ड झालेले संभाषण ऐकुण गै.अ. यांनी मला दि. 24.09.2021 रोजी पो.स्टे आमगाव येथे बोलाविल्याची खात्री केली. पो.नि.
श्री तवाडे यांनी गै.अ यांचेविरुध्द पुढील लाच मागणी पडताळणी कार्यवाही दि.24.09.2021 रोजी करण्याचे ठरवुन मला दि. 24.09.2021
रोजी सकाळी वेळ 08.00 वा. मोक्षधाम आमगाव येथे हजर राहण्याची सुचना दिली. याबाबतच्या सविस्तर नोंदी पो.नि. श्री तवाडे यांनी
पंचनामा क्र. 1 मध्ये घेतल्या आहेत.पो.नि. श्री तवाडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दि. 24.09.2021 रोजी सकाळी वेळ 08.00 वा.
मोक्षधाम आमगाव येथे हजर आलो. काही वेळाने पो.नि. श्री तवाडे हे सापळा पथकासह हजर आले. पो.नि. श्री. तवाडे यांनी आम्हास व पंचास
पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ 08.58 वाजता व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. 1
व माझ्या आवाजात पडताळणीकरीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकार्डरसह मला पंच क्र. 1 यांचेसोबत माझ्या
खाजगी मोटार सायकलने गै.अ. श्री. उरकुडे यांचेषी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता पो.स्टे.आमगाव येथे जाण्यास रवाना केले. मी
पंच क्र. 1 यांचे सोबत गै.अ. यांचेषी भेटण्याकरीता पोलीस स्टेषन आमगाव येथे गेलो असता त्याठिकाणी गै.अ. मिळुन आले नाही. त्यावरून मी
आपले मोबाईलवरून गै.अ. श्री. उरकुडे यांचे मोबाईलवर संपर्क साधुन मी पो.स्टे. आल्याचे त्यांना कळविले असता त्यांनी मला म्हटले की,
माझी नाईट डयुटी होती, म्हणुन मी घरी आहे, मी 11.00 ते 11.30 वाजेपर्यंत पो.स्टे.ला येईन, थांबत असाल तर थांबा व सायंकाळी तुमच्या
गावाकडे येईन व यानंतर मी तुला फोन करणार, तु मला फोन करायचे नाही असे सांगितले. त्यानंतर वेळ 09.23 वा. मी पंच क्र. 1 यांच्यासह
पो.नि. श्री तवाडे थांबुन असलेल्या ठिकाणी परत आल्यावर व्हाईस रेकार्डर पंच क्र. 1 यांच्या आवाजात बंद करण्यात आले.त्यानंतर पो.नि. श्री
तवाडे यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकार्डर मधील रेकार्ड झालेले संभाषण ऐकुण गै.अ यांचेविरुध्द पुढील लाच मागणी पडताळणी कार्यवाही गै.अ.
यांनी सांगितल्याप्रमाणे गै.अ. यांना तक्रारदाराचा फोन आल्यावर पुढील लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. दुपारी
13.00 वाजेपर्यंत वाट बघुन सुध्दा गै.अ. यांनी मला फोनवर संपर्क न केल्याने व गै.अ. हे मला गावात भेटण्याची शक्यता असल्याने पो.नि. श्री
तवाडे यांनी गै.अ. विरुध्दची लाच मागणी पडताळणी कार्यवाही मौजा हिराटोला येथे जावुन करण्याचे ठरविले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 माझे
खाजगी मोटार सायकलने व पो.नि. श्री तवाडे हे सापळा पथकासह वाहनाने त्याठिकाणाहुन रवाना होवुन मौजा हिराटोला गावाजवळच्या घुबेटोला
तलावाजवळ जाऊन थांबलो. त्यानंतर पो.नि. श्री तवाडे यांनी लाच मागणी पडताळणी कार्यवाही माझ्या हिराटोला येथील राहत्या घरुन करण्याचे
ठरवुन मला व पंच क्र. 1 ला माझ्या घरी जाण्यास रवाना केले. पो.नि. श्री तवाडे हे स्टाफसह आमच्या मागो माग माझ्या हिराटोला येथील घरी
पोहचुन माझे घरी थांबले. त्याठिकाणी पो.नि. श्री तवाडे यांनी आम्हास व पंचास पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना
दिल्या. वेळ 17.30 वा. पर्यंत वाट पाहुन सुध्दा गै.अ. यांची येण्याची शक्यता वाटत नसल्याने पो.नि. श्री तवाडे यांनी गै.अ. विरुध्दची लाच
मागणी कार्यवाही दि. 27.09.2021 रोजी करण्याचे ठरविले. पो.नि. श्री तवाडे यांनी मला गै.अ. श्री. उरकुडे यांनी मला कोणत्याही प्रकारे लाच
मागणी सबंधाने संपर्क केल्यास त्यांना भेटण्यास 3 तासाचा अवधी घेवुन त्वरीत त्यांना अवगत करण्याबाबत सांगुन अन्यथा दि. 27.09.2021
रोजी सांगीतलेल्या ठिकाणी हजर राहणेबाबत सुचना दिले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पो.नि. श्री तवाडे यांनी पंचनामा क्र. 2 मध्ये घेतल्या
आहेत.दि. 27.09.2021 रोजी पो.नि. श्री तवाडे यांनी मला संपर्क करुन मोक्षधाम आमगाव येथे हजर राहण्याचे सुचना दिल्या. त्यानुसार मी
मोक्षधाम आमगाव येथे पोहचलो. त्याठिकाणी पो.नि. श्री तवाडे हे सापळा पथकासह हजर आले. त्याठिकाणी पो.नि. श्री तवाडे यांनी आम्हास व
पंचास पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. वेळ 17.02 वाजता व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. 1
व माझ्या आवाजात पडताळणीकरीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकार्डरसह मला पंच क्र. 1 यांचेसोबत माझ्या
खाजगी मोटार सायकलने गै.अ. श्री. उरकुडे यांचेषी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता पो.स्टे.आमगाव येथे जाण्यास रवाना केले.
मी पंच क्र. 1 यांचे सोबत पो.स्टे आमगाव येथे गेलो असता त्याठिकाणी गै.अ. मिळुन आले नाही. या दरम्यान गै.अ. श्री उरकुडे यांनी मला त्यांचे
मोबाईलवरुन माझे मोबाईलवर संपर्क साधुन मला पो.स्टे. आला आहे का? याबाबत विचारपुस केली. त्यावर मी त्यांना पो.स्टे.ला आल्याचे
त्यांना सांगितले असता त्यांनी मला पो.स्टे. थांबा, मी येतो असे सांगितले. त्यानंतर गै.अ. हे पो.स्टे. आमगाव येथे आले. त्यांचेषी बोलणी
दरम्यान त्यांनी मला सांगितले की, तुझ्या तक्रारीवरून कुर्वे यांच्याविरूध्द कार्यवाही केलेली आहे, तसेच कुर्वे यांच्या तक्रारीवरुन तुझ्यावर
कार्यवाही करावयाची आहे., मी उदया दि. 28.09.2021 रोजी तुझ्या गावी हिराटोला येथे येवुन तुला भेटणार आहे. अषाप्रकारची बोलणी
केली. त्यानंतर वेळ 17.27 वा. मी पंच क्र. 1 यांच्यासह पो.नि. श्री तवाडे थांबुन असलेल्या ठिकाणी परत आल्यावर व्हाईस रेकार्डर पंच क्र. 1
यांच्या आवाजात बंद करण्यात आले. त्यानंतर पो.नि. श्री तवाडे यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकार्डर मधील रेकार्ड झालेले संभाषण ऐकुण गै.अ. हे



स्टेशन,आमगांव
जि.गोंदिया

मला दि. 28.09.2021 रोजी हिराटोला येथे येवुन भेटणार असल्याची खात्री केली. पो.नि. श्री तवाडे यांनी गै.अ यांचेविरुध्द पुढील लाच मागणी पडताळणी कार्यवाही दि.28.09.2021 रोजी करण्याचे ठरवुन मला दि. 28.09.2021 रोजी वेळ 12.00 वा. ग्राम हिराटोला जवळील घु

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): vilas kisanrao nale(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

30/9/021

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): vilas kisanrao nale
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API

स्टेशन डायरी अंमलदार
पो.स्टे.आमगांव
दि.30/09/2021

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

